CMYK

सायं.दैनिक आवाज जनसामान्यांचा..

# बीड किसान

• संपादक : शेख कामरान •

बीड ▪ वर्ष ५ ▪ अंक ५७ ▪ गुरुवार, दि. ०३ जुलै, २०२५ ▪ पोस्टल दिनांक ०४ जुलै, २०२५ ▪ RNI : MAHMAR/2021/80738 ▪ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ▪ पाने ४ ▪ किंमत २ रु.

BEED ▪ Year-5 ▪ Issue-57 ▪ Thursday 03 July, 2025 ▪ Postal Date 04 July, 2025 ▪ RNI : MAHMAR/2021/80738 ▪ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ▪ Pages 4 ▪ Price 2

## महाराष्ट्रात फक्त तीन महिन्यांत ७६७ शेतकऱ्यांनी गळ्याला दोरी लावली

मुंबई : महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांवरून लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मोदी सरकारवर आणि महायुती सरकारवर हल्लाबोल केला. ते म्हणाले की, केंद्र सरकार शेतकऱ्यांच्या दुर्दशेबद्दल उदासीन आहे, तर शेतकरी दिवसेंदिवस कर्जाच्या ओझ्याखाली अधिकाधिक बुडत आहेत. एक्सवरील एका पोस्टमध्ये राहुल गांधी यांनी सरकारवर कर्जमाफी आणि पिकांसाठी किमान आधारभूत किमतीची (एमएसपी) कायदेशीर हमी या शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप केला. त्यांनी लिहिले की, कल्पना करा... महाराष्ट्रात फक्त तीन महिन्यांत ७६७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. ही फक्त एक आकडेवारी आहे का? नाही. ही ७६७ उद्ध्वस्त घरे आहेत. ७६७ कुटुंबे जी कधीही सावरू शकणार नाहीत आणि सरकार? गप्प आहे. उदासीनतेने पाहत आहे. 'शेतकरी दिवसेंदिवस कर्जात बुडत आहेत.

# पोलिसांनी त्या भडव्या विजय पवारला लाल मिरची ची धुरी देऊन सगळं त्याच्या तोंडाने कबुल करायला लावायला पाहिजे; पालकांनो तुम्ही पण पुढेया, या भडव्याच माज उतरविण्यासाठी लढाई हातात घ्या!

## आजपर्यंत या विजय पवारने कित्येक मुलींसोबत अत्याचार केले असतील? ; याच्या ज्ञानेश्वर पब्लिक स्कूलमध्ये सुद्धा अत्याचार झाल्याची खूप चर्चा असून त्या पालकांनी पुढे यायला पाहिजे




बीड । किसान न्युज

उमाकिरण बाल लैंगिक अत्याचाराचा गुन्हा दाखल असलेला आरोपी विजय पवार सारख्या वृत्ती ठेचायच्या असतील तर पालकांनी चार भिंतींच्या आड तळमळून फायदा नाही. आता वेळ समोर येऊन लढा देण्याची गरज असून असे झाले तरच त्या लेकीला न्याय मिळणार आहे. तर भडव्या विजय पवार व प्रशांत खाटोकर या दोघांना पोलिसांनी मिरची ची धुरी देऊन त्यांच्याकडून खरं ते बाहेर काढावं, यामुळे पालकांनी घराबाहेर पडून लढाई हातात घ्यावी व तक्रार करावी असे मत व्यक्त केले जात आहे. तर पोलीस अधीक्षक यांनीही आवाहन केले असून तक्रारदाराचे नाव गुप्त ठेवण्यात येणार आहे. पोलीस अधीक्षक यांच्या आवाहनानंतर एका पालकाने पुढे येत विजय पवार विरोधात तक्रार केली. हाच आदर्श घेऊन इतरही पालकांनी पुढे यावे अशी अपेक्षा सुज्ञ नागरीकांची आहे. असे आसतीनातीला साप ठेचायलाच हवेत अशी प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे. शहरातील उमाकिरण शैक्षणिक संकुल मधील नीटची तयारी करीत असलेल्या अल्पवयीन मुलीचा क्लासेस चालकांकडून छळ करण्यात आला. हा प्रकार जवळपास सदरील मुलीने अकरा महिने सहन केला. याबाबत तक्रार केल्यानंतर याप्रकरणी विजय पवार आणि प्रशांत खाटोकर » पान २ वर

### ज्ञानेश्वर पब्लिक स्कूलची चौकशी होणे आवश्यक

बाल लैंगिक अत्याचार प्रकरणी कोठडीत असलेल्या विजय पवारची ची बार्शी रोडवरील ज्ञानेश्वर पब्लिक स्कूल ही शाळा आहे. येथे विद्यार्थी व पालकांचा फीस साठी छळ करण्यात येतो. अनेकवेळा विद्यार्थ्यांना फीस साठी चक्क वर्गात बसू न देता उन्हात उभे करण्याचा प्रकार घडला आहे. तसेच येथे आरटीई कायद्याची पायमल्ली करण्यात येत आहे. तर ही शाळा बिंदुसरा नदीच्या काठावर बांधलेली असल्याने ती रेड झोनमध्ये येते का? याचीही तपासणी संबंधित प्रशासनाने करावी अशी मागणी करण्यात येत आहे.



### उमाकिरण प्रकरणी विशेष चौकशी समिती गठीत

शहरातील उमाकिरण शैक्षणिक संकुलात नीट परीक्षेच्या तयारीसाठी शिकत असलेल्या १७ वर्षीय विद्यार्थिनीच्या लैंगिक छळ प्रकरणात आता पोलीस प्रशासन अधिक संवेदनशीलतेने पुढे सरसावले आहे. या प्रकरणात पोक्सो कायद्यान्वये गुन्हा दाखल झाल्यानंतर वडवणीच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक वर्षा व्होगाडे-शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली एक विशेष चौकशी समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीत मानसोपचार तज्ज्ञ, महिला पोलीस अधिकारी आणि दक्षता समिती सदस्यांचा समावेश आहे. अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या आदेशानुसार ही समिती स्थापन करण्यात आली.

### रुपाली चाकणकर देणार बीडला भेट



महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर या शनिवारी (दि.५) जुलै रोजी बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येणार आहेत. यावेळी त्या बीड येथील माध्यमांशी संवाद साधणार आहेत. यामुळे त्या उमाकिरण बाल लैंगिक अत्याचार प्रकरणी गंभीर दिसत आहेत.

# दिव्यांग, ज्येष्ठांना खा.बजरंग सोनवणेंमुळे मिळणार 'आधार'

## जिल्ह्यात १८ जुलैपासून कृत्रिम साहित्याचे वाटप, पंचायत समिती स्तरावर शिबिरांचे आयोजन

### असे असणार शिबिराचा दिनांक अन् ठिकाण...

| तालुका | दिनांक | ठिकाण |
|---|---|---|
| केज | १८ जुलै | पंचायत समिती |
| अंबाजोगाई | १९ जुलै | पंचायत समिती |
| बीड | २१ जुलै | पंचायत समिती |
| माजलगाव | २२ जुलै | पंचायत समिती |
| पाटोदा | २३ जुलै | पंचायत समिती |
| वडवणी | २४ जुलै | पंचायत समिती |
| आष्टी | २५ जुलै | पंचायत समिती |
| धारूर | २६ जुलै | पंचायत समिती |
| परळी | २८ जुलै. | पंचायत समिती |
| शिरूर | २९ जुलै | पंचायत समिती |
| गेवराई | ३०जुलै | पंचायत समिती |

बीड । किसान न्युज

दिव्यांग बांधवांना सहानुभूती नव्हे, तर भक्कम साथ देऊया!, या उदात्त दृष्टीकोनातून खा.बजरंग सोनवणे यांच्या निर्देशानुसार जिल्हा प्रशासन व एलिम्को मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने संपुर्ण बीड लोकसभा मतदार संघामध्ये दिव्यांग व्यक्तींना व ज्येष्ठ नागरिकांना मोफत कृत्रिम साहित्य/साधने वाटप करण्यात येणार आहे. दि.१८ जुलैपासून हे शिबीर पंचायत समिती स्तरावर राबविण्यात येत आहे. बीड लोकसभा मतदारसंघातील तालुक्यांमध्ये भव्य पूर्व तपासणी व नोंदणी शिबिरे आयोजित करण्यात आली आहेत. या शिबिरांचा मुख्य उद्देश दिव्यांग व्यक्तींना मोफत कृत्रिम अवयव, विविध सहाय्यभूत साधने उपलब्ध करून देणे, तसेच ज्येष्ठ नागरिकांना 'राष्ट्रीय वयोश्री योजने' अंतर्गत मोफत सहाय्यक उपकरणे प्रदान करणे हा आहे. एलिम्को, मुंबई या केंद्र शासनाच्या अधिकृत संस्थेच्या माध्यमातून, १८ जुलै ते ३० जुलै २०२५ या कालावधीत बीड लोकसभा मतदार संघात ही विशेष शिबिरे आयोजित केली जातील. या शिबिरांमध्ये पात्र लाभार्थ्यांची आरोग्य तपासणी, नोंदणी प्रक्रिया आणि आवश्यकतेनुसार » पान २ वर




# पुन्हा बीड जिल्हा हादरला

## गतिमंद तरुणीवर अत्याचार; आरोपी पोलिसांच्या ताब्यात

केज । किसान न्युज

गतीमंद मुलीवर बलात्कार करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी आरोपीविरोधात गुन्हा दाखल करत पोलिसांनी त्याला बेड्या ठोकल्या आहेत. ही घटना बीडच्या केजमध्ये घडली. सदरील गुन्ह्यातील आरोपीने वाल्मीक कराडच्या सुटकेसाठी आंदोलन केले होते. या घटनेमुळे बीडमध्ये खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, बीडच्या केज पोलिस ठाण्याच्या हद्दीतील एका गावात ही धक्कादायक घटना घडली. वाल्मिक कराडचा समर्थक नानासाहेब चौरे नामक व्यक्ती ने गावात राहणार्या एका गतीमंद मुलीवर बलात्कार केला. आरोपीने बळजबरी बलात्कार करताना पिडीतेच्या नात्यातील एका महिलेने पाहिले आणि तिला वाचवण्याचा प्रयत्न केला. आरोपीने दोघींनाही जीवे मारण्याची धमकी दिली. आरोपीने हा » पान २ वर



## माजी विद्यार्थ्यांकडून मुख्याध्यापकाचा सत्कार करत व्यक्त केली कृतज्ञता

बीड (किसान न्युज): येथील नॅशनल उर्दू हायस्कूल आणि ज्युनिअर कॉलेज, जुना बाजार बीड येथे तेथील माजी विद्यार्थी यांनी आज २ जुलै २०२५ रोजी मुख्याध्यापक पदाचा कार्यभार स्वीकारल्याने नवीन मुख्याध्यापकांचा सत्कार करत शाळेबद्दल आपली जबाबदारी आणि कृतज्ञता व्यक्त केली. सुरुवातीला यावेळी शाळेचे मुख्याध्यापक सिद्दीकी नदीम सर यांचा शाळेतील माजी विद्यार्थी यांनी शाल, पुष्पगुच्छ देवून सत्कार केला व यावेळी शेख मोहम्मद सलीम यांनी मनोगत व्यक्त केले की गुरुजींच्या मार्गदर्शनामुळे आम्ही जीवनातील प्रत्येक अडचणींचे वळण सहज पार करु शकलो त्यामुळे आज आम्हाला आमच्या शाळेत » पान २ वर

# सराईत चोरटा पकडला सहा दुचाकी जप्त...

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई



बीड । किसान न्युज

स्थानिक गुन्हे शाखेने तेलगाव रोडवर सापळा लावून सराईत दुचाकी चोर पकडला असून, त्याच्या ताब्यातून चोरीच्या सहा दुचाकी किंमत ३ लाख ५० हजारांचा मुद्देमाल जप्त केला. यामध्ये ५ दुचाकी या शिवाजीनगर पोलीस ठाणे हद्दीतून चोरी झालेल्या असल्याचे गुन्हे उघडकीस आले. बीड शहरासह जिल्ह्यात दुचाकी चोरीच्या घटना थांबण्याचे नाव घेत नसल्याने या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी आदेश दिले आहेत. यामुळे स्थानिक गुन्हे शाखेच्या रडावर दुचाकी चोर असून याचा तपास » पान २ वर

# आषाढी एकादशीला भाविकांची कसलीही गैरसोय होऊ नये

## आ.संदीप क्षीरसागरांनी पोलीस, आरोग्य, एस.टी, महावितरण विभागाला दिल्या सूचना



बीड । किसान न्युज

आषाढी एकादशी या महाराष्ट्रातील वारकरी सांप्रदायाच्या सर्वात मोठ्या महोत्सवाच्या वेळी भाविकांची गैरसोय टाळण्यासाठी प्रशासनाने उपाययोजना कराव्यात आणि काळजी घ्यावी. अशा सूचना आ.संदीप क्षीरसागर यांनी प्रशासनाला दिल्या आहेत. रविवारी (दि.६ जुलै २०२५) रोजी आषाढी एकादशी आहे. एकादशीच्या निमित्त, बीड तालुक्यात असलेल्या धाकटी पंढरी श्री क्षेत्र नारायणगड येथे संपूर्ण बीड जिल्ह्यातून भाविक येतात. तसेच बीड जिल्ह्यातून अनेक भाविक पंढरपुरला जातात. या अनुषंगाने भाविकांची गैरसोय टाळण्यासाठी आ.संदीप क्षीरसागर यांनी प्रशासनाला सूचना केल्या आहेत. श्री क्षेत्र नारायणगड येथे जिल्ह्याच्या प्रत्येक भागातून भाविक येतात. त्यांच्यासाठी सर्व आगारांतून श्री क्षेत्र नारायणगडावर जाणे-येणेसाठी दिवसभर विशेष बसेसची व्यवस्था करावी आणि श्री क्षेत्र पंढरपूरला जाण्यासाठी बीड आगारातून जादा बसेस सोडण्यात याव्यात अशा सूचना आ.क्षीरसागर यांनी एस.टी. विभागाचे विभाग नियंत्रक यांना दिल्या आहेत. श्री क्षेत्र नारायणगड येथे सुरक्षाव्यवस्था, पार्किंग, दर्शन रांग » पान २ वर

# बीड येथे 'सीट्रिपलआयटी' उभारणीच्या कामाला गती

## पालकमंत्री अजित पवार यांची माहिती

मुंबई । किसान न्युज

उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांच्या संकल्पनेतून साकार होत असलेल्या 'सीट्रिपलआयटी' या औद्योगिक प्रशिक्षण केंद्राला निधी उपलब्ध करुन देण्याचा निर्णय झाल्याने या कामाला लवकरच गती येईल असे सांगितले आहे. बीड येथे 'टाटा टेक्नॉलॉजी'च्या माध्यमातून सुरु करण्यात येणाऱ्या 'सेंटर फॉर इन्व्हेंशन, इनोव्हेशन, इक्युबेशन अँड ट्रेनींग' अर्थात 'सीट्रिपलआयटी'साठी बीड एमआयडीसी औद्योगिक क्षेत्राच्या सुविधा क्रमांक तीन मधील चार हजार चौरस मीटर जागा तसंच केंद्र उभारणीसाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्याचा निर्णय 'एमआयडीसी'च्या संचालक मंडळानं घेतला आहे. या निर्णयामुळे बीड जिह्यातील युवकांना औद्योगिक प्रशिक्षण, तांत्रिक कौशल्यविकासाच्या माध्यमातून उद्योगक्षम बनवणं, रोजगार, स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करुन होण्याचा मार्ग खुला झाला आहे. 'एमआयडीसी'च्या या महत्वपूर्ण निर्णयामुळे केंद्रासंदर्भातील त्रिपक्षीय करार आणि प्रकल्पाचे भूमीपूजन लवकरच होईल, अशी अपेक्षा आहे, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले.





बीड -येथील नगरपरिषद येथे आज गुरुवारी दि.०३-०७-२०२५ जिल्हा सह आयुक्त संभाजी वाघमारे नगर प्रशासन जिल्हाधिकारी कार्यालय बीड, यांनी बीड जिल्ह्यातील सर्व नगरपरिषद मुख्याधिकारी आणि सर्व नगरपरिषद आस्थापना विभाग प्रमुख यांना १५० दिवसांचा कार्यक्रमा अंतर्गत मार्गदर्शन केले.

**पाहिजेत**

अनुभवी मॅनेजर व रूम बॉय नाईट साठी हॉटेल हिना लॉज जालना रोड बीड

Mob : 9325343615

# मागण्या मान्य न झाल्याने बीड जिल्हा रुग्णालयात आत्मदहन करण्याचा इशारा

बीड । किसान न्यूज

येथील जिल्हा रुग्णालयात रुग्णांच्या जिवाशी खेळ होत असून, डॉक्टर गैरहजर रहात असून कॉल करुनही वेळेवर येत नसल्याने त्यांच्यावर कारवाई करावी अशी मागणी केली होती. पण त्यावर काहीच कारवाई न झाल्याने आता जिल्हा रुग्णालयात आत्मदहनाचा इशारा दिला आहे. मागील महिन्यात शहरातील शिंदे नगर भागात राहणाऱ्या स्वाती कानडे हे घरात लागलेल्या आगीत ६०% जळाली होती यांना उपचार साठी जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले असता तेथे डॉक्टर उपस्थित नव्हते. संबंधित डॉक्टरला अनेक वेळा कॉल करून सुद्धा डॉक्टर न आल्यामुळे डॉक्टरची तक्रारा करण्यात आली होती त्यानंतर कोणतीही कारवाई न झाल्याने २३/६/२०२५रोजी जिल्हा रुग्णालयाच्या » पान २ वर

स्थानिक सोने चांदीचे भाव..

पंकज ज्वेलर्स

पिंगळे गल्ली, कारंजा रोड, बीड
✆ 9850643058

| | |
|---|---|
| सोने २४ कॅरेट | 98,300 |
| २२ कॅरेट | 96,000 |
| चांदी प्रतिकिलो | 107,000 |

CMYK